Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

## (AUTONOMOUS)

## Department of Computer Science

in association with

**Pudhari Social Foundation**

and

**Primary Education Committee,**

**Kolhapur Municipal Corporation**

organized

# "e-Learning Program in Kolhapur Municipal Corporation Schools"

**INTRODUCTION:**

Department of Computer Science, Vivekanand College, Kolhapur (Autonomous) in association with Pudhari Social Foundation, Kolhapur and Primary Education Committee, Kolhapur Municipal Corporation decided to start "e-Learning Program in Kolhapur Municipal Corporation Schools" in the year 2019 but due to corona pandemic the scheduled initiative was started late.

**OBJECTIVES:**

**Enhancing Digital Literacy:** The primary objective of this best practice is to enhance digital literacy among students in Kolhapur Municipal Corporation schools. It aims to empower them with the necessary skills and knowledge to effectively use computer systems, operating systems, laptops and smart boards etc.

**Teacher Training:** Another key goal is to provide training to school teachers. This training will enable educators to incorporate technology into their teaching methods and make the learning experience more engaging and effective for their students.

**Bridge the Digital Divide:** The initiative seeks to bridge the digital divide by ensuring that students in these schools have access to the same technological resources as their peers in more privileged settings. This promotes equal opportunities for quality education.

**Community Collaboration:** The collaboration between the Department of Computer Science at Vivekanand College, Kolhapur, Pudhari Social Foundation, and the Primary Education Committee of Kolhapur Municipal Corporation underscores the objective of fostering community engagement and support in education.

**MOTIVATION:**

**Covid-19 Pandemic Impact:** The Covid-19 pandemic disrupted traditional classroom education, highlighting the importance of e-learning and digital literacy. The delay in starting the initiative was driven by the pandemic's unforeseen challenges, which emphasized the need for digital education even more.

**Existing Infrastructure:** The Kolhapur Municipal Corporation had already provided computer systems and other essential resources like smart boards to its schools. The motivation behind the initiative was to ensure that these resources were used to their fullest potential for the benefit of students.

**Community Support:** The involvement of the Pudhari Social Foundation and the Primary Education Committee, along with the cooperation of the Deputy Commissioner of Kolhapur Municipal Corporation, **Mr. Ravikant Adsul**, and **Ms. Shilpa Darekar Madam** demonstrated the strong support and motivation from the local community and government authorities to uplift the quality of education in municipal schools.

**Skill Gap:** Recognizing the gap between the availability of technology and the proficiency to use it effectively, the initiative aims to address this skill gap by providing training and hands-on experience to both students and teachers.

**IMPLEMENTATION PROCESS:**

**Collaborative Meetings:** The initiative began with meetings involving key stakeholders, including the Deputy Commissioner, school Principals and Headmasters. These meetings were crucial for gaining support and approval for the program.

**Selecting Schools:** After discussions, two schools were chosen to launch the e-learning program, as part of a phased approach.

**Commencement:** The e-learning program officially started in 2022 with students and teachers from Vivekanand College visiting the selected schools to provide training and support. This will continue into the next year.

**BENEFITS AND IMPACT:**

**Enhanced Education:** The initiative equips students with valuable digital skills, enabling them to excel in an increasingly technology-driven world.

**Empowered Educators:** Teachers gain the knowledge and confidence to use technology effectively in their teaching, making lessons more engaging and informative.

**Digital Inclusion:** Bridging the digital divide ensures that students in municipal schools are not left behind in the digital era, contributing to a more equitable society.

**Community Participation:** The collaboration between educational institutions, the local government, and a social foundation demonstrates the power of community engagement in addressing critical issues in education.


डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् विद्यामंदिर




कोण कोठे राहतो ?
ग्रेगरियन वर्ष
Academic Partner
Next Education






मराठी महिने
१. चैत्र ७. अश्विन
२. वैशाख ८. कार्तिक
३. ज्येष्ठ ९. मार्गशीर्ष
४. आषाढ १०. पौष
५. श्रावण ११. माघ
६. भाद्रपद १२. फाल्गुन

पुढारी
प्रयोग फाऊंडेशन | प्रयोगातून प्रगतीकडे...

PUDHARI PUBLICATION PVT., LTD.
Pudhari Bhavan, 2318, C Ward,
Bhausingji Road, Kolhapur 416002
Maharashtra (INDIA)
Phone : (0231) 2543111, 12, 14
Fax : (0231) 2543124, 25

दिनांक - ४ जानेवारी २०२२

प्रति,
मा प्राचार्य सो
विवेकानंद महाविद्यालय,
कोल्हापूर

विषय : इ- लर्निंग उपक्रमाचे आयोजनाबाबत

महोदय ,

दैनिक 'पुढारी' संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशन व कॉम्प्युटर सायन्स विभाग , विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विदयमाने शालेय विदयार्थ्यांसाठी इ- लर्निंग उपक्रमाचे आयोजन करणेचा मानस आहे. हा उपक्रम कोल्हापूर महानगरपालिका संचलित ५७ शाळांमध्ये घेण्यात येणार आहे. उपक्रमांतर्गत इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विदयार्थ्यांसाठी कॉम्पुटर सायन्स विभागाकडून विशेष अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे.

उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात श्रीमंत विजयादेवी घाडगे विदयालय व न्यू पॅलेस विदयालय येथील ५वी ते ७वी च्या विदयार्थ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग (प्रॅक्टिकल सेसन्स) घेण्यात येतील. त्याचबरोबर कॉम्प्युटर सायन्स विभागातील विदयार्थी इतर शाळांमध्ये प्रोजेक्टरच्या साहाय्याने प्रशिक्षण देतील.

उपक्रमाचा प्रारंभ महानगरपालिका शाळांतील शिक्षकांच्या प्रशिक्षण सत्राने करीत आहोत.

शिक्षक प्रशिक्षण सत्र कार्यक्रम वेळ व दिनांक - सोमवार १० जानेवारी २०२१, सकाळी १०.३०वाजता
कार्यक्रम स्थळ - विवेकानंद महाविदयालय , कोल्हापूर

या उपक्रमास आपण रीतसर मान्यता देऊन सहकार्य करावे ही विनंती .

आपला ,
दै.'पुढारी 'प्रयोग सोशल फाऊंडेशन करिता,

for अधिकृत स्वाक्षरी

परिपत्रक क्रमांक :- 2

प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर. दिनांक ०६/०१/२०२२.

मुख्याध्यापक,
फक्त महानगरपालिका शाळा,
शहर कोल्हापूर.

**विषयः- ई-लर्निंग उपक्रमाचे आयोजनाबाबत.**

संदर्भः- पुढारी पब्लिकेशन प्रा. लि., कोल्हापूर यांचे दिनांक ६.०१.२०२२ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये दैनिक पुढारी संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशन व कॉम्प्युटर सायन्स विभाग, विवेकानंद महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग उपक्रमाचे आयोजन करणेचा मानस आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या शाळांतील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सायन्स विभागाकडून विशेष अभ्यासक्रम निश्चित करणेत आलेला आहे.

यासाठी प्रत्येक शाळेतील १ शिक्षक संगणक प्रशिक्षणासाठी पाठवून द्यावा. सदर शिक्षक संगणक हाताळणारा असावा.

शिक्षक प्रशिक्षण सत्र व कार्यक्रम वेळ व दिनांक- सोमवार दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता विवेकानंद कॉलेज, नागाळा पार्क, कोल्हापूर

कळावे.

(डी. सी. कुंभार)
प्रशासनाधिकारी,
प्राथमिक शिक्षण समिती, म.न.पा., कोल्हापूर.

पुढारी

# डिजिटल युगात शालेय स्तरावर संगणक साक्षरता आवश्यक

## प्राचार्य कुंभार; दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन, विवेकानंद महाविद्यालयातर्फे ई-लर्निंग उपक्रमाचा प्रारंभ

### चतुर्थ वर्धापनदिनी विशेष उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डिजिटल युगात शालेय स्तरावर संगणक साक्षरता आवश्यक आहे. संगणकाविषयी विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण होऊन प्रत्येकाला संगणक कौशल्याने हाताळता आला पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले.

दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन, विवेकानंद महाविद्यालय, प्राथमिक शिक्षण समिती यांच्या वतीने महानगरपालिका शाळांमध्ये आयोजित ई-लर्निंग उपक्रमाच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. शैक्षणिक पर्यवेक्षक बाळासाहेब कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. दै. 'पुढारी' संचलित 'प्रयोग सोशल फाऊंडेशन'च्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. कुंभार म्हणाले, महानगरपालिकेच्या ५८ शाळांमध्ये एकत्रित राबविण्यात येणारा उपक्रम विद्यार्थ्यांसह शिक्षकांना संगणक साक्षरतेसाठी दिशादर्शक ठरेल. उपक्रम वर्षभर सुरू ठेवण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड केली आहे. हे विद्यार्थी शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन विद्यार्थ्यांना संगणक साक्षरतेचे धडे देतील.



**कोल्हापूर : दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशनतर्फे महापालिका शाळांमध्ये आयोजित ई-लर्निंग उपक्रमाच्या प्रारंभप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. व्यासपीठावर बाळासाहेब कांबळे, प्रा. आय. के. मुजावर, प्रा. राजश्री पाटील, प्रा. व्ही. बी. वाघमारे. (छाया : नाज ट्रेनर)**

पर्यवेक्षक कांबळे म्हणाले, मनपा शाळेतील पाचवी ते सातवीचे विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील. प्राथमिक टप्प्यात श्रीमंत विजयादेवी घाटगे विद्यालय व न्यू पॅलेस विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना विवेकानंद महाविद्यालयातील अद्ययावत कॉम्प्युटर लॅबमध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याप्रसंगी शिक्षकांना चित्रफितीद्वारे प्रशिक्षण देण्यात येऊन उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली. यावेळी प्रा. समरीन मुल्लाणी, मृणाल दिंडे, मनपा शाळांचे शिक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. राजश्री पाटील यांनी केले.

सूत्रसंचालन प्रयोग सोशल फाऊंडेशनचे समन्वयक विक्रम रेपे यांनी केले. प्रा. व्ही. बी. वाघमारे यांनी आभार मानले. उपायुक्त रविकांत आडसूळ, शिल्पा दरेकर, 'विवेकानंद'चे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्रशासन अधिकारी डी. सी. कुंभार यांचे उपक्रमास सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

### चार हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना लाभ

ई-लर्निंग उपक्रमाचा महानगरपालिका शाळांतील चार हजार दोनशे शहात्तर विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. यात संगणक ओळख, विंडोज ऑपरेटिंग सिस्टीम, फाईल्सचे व्यवस्थापन, वर्डपॅड, पेंट, कॅल्क्युलेटर, मायक्रोसॉफ्ट वर्ड, एक्सेल, इंटरनेट परिचय असा अभ्यासक्रम इयत्तानिहाय निश्चित केला आहे. या उपक्रमाबद्दल उपस्थित शिक्षकांनी 'प्रयोग'चे अभिनंदन करून वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.


GPS Map Camera
Kolhapur, MH, India
Bavda Road, Kasaba Bawada, Kolhapur,
Lat 16.730628, Long 74.241838
04/25/2022 08:59 AM


GPS Map Camera
Kolhapur, MH, India
Bavda Road, Kasaba Bawada, Kolhapur,
Lat 16.730627, Long 74.241836
04/26/2022 09:58 AM



पुढारी

# मनपा शाळांमध्ये ई -लर्निंग उपक्रमास प्रारंभ

## दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालयाचा उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मनपाच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही तंत्रज्ञानाधिष्ठित व अद्ययावत शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट करण्याच्या हेतूने दै. 'पुढारी' संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व प्राथमिक शिक्षण समिती, मनपा यांच्या सहकार्यातून ई-लर्निंग उपक्रम ५८ शाळांत राबवण्यात येणार आहे. याचा शुभारंभ कसबा बावडा येथील राजर्षी शाहू विद्यामंदिर, शाळा क्र. ११ येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाणार आहे. संगणक ओळख, विंडोज ऑपरेटिंग सिस्टीम, फाइल्सचे व्यवस्थापन, वर्डपॅड, पेंट, कॅल्क्युलेटर, एक्सेल, इंटरनेट परिचय असा इयत्ता निहाय अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा लाभ चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना होणार आहे. 'विवेकानंद'चे डॉ. विशाल वाघमारे, राजश्री पाटील-शेंद्रे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

यावेळी केंद्र मुख्याध्यापक डॉ. अजितकुमार पाटील, उत्तम कुंभार, सुशील जाधव, सुजाता आवटी, तमेजा मुजावर, शिवशंभू गाटे, आसमा तांबोळी, कल्पना मैलारी आदींची उपस्थिती होती.



**कोल्हापूर : कसबा बावडा येथील राजर्षी शाहू विद्यामंदिर येथे ई-लर्निंग उपक्रमात सहभागी विद्यार्थी आणि शिक्षक. (छाया : पप्पू अत्तार)**

### राजर्षी शाहूंच्या माहितीपटाचे सादरीकरण

लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त विद्यार्थ्यांना दै. 'पुढारी'च्या वतीने यू-ट्यूब चॅनेलवर प्रसारित केलेल्या राधानगरी धरण, हत्तीमहाल, साठमारी, दाजीपूर अभयारण्य या ऐतिहासिक स्थळांच्या चित्रफिती आवर्जून दाखवण्यात आल्या. चित्रफीत निर्मिती प्रक्रिया कशा पद्धतीने होते याची तांत्रिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

My Kolhapur Edition
Apr 26, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in